| | Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's<br>**College of Education, Barshi**<br>Publicity 2025 to 2026 |
|---|---|

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi,

(Maharashtra)

---

**Academic Year 2025-2026**

---

# Publicity

---

Submitted by

**Prof. Dr. V. P. Shikhare**

**I/C Principal**

**Prof. Dr. M. S. Disale**

**IQAC Coordinator**

**Dr.M.V.Mate**

**Publicity Coordinator**

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2025 to 2026**

# पुढारी

News by
गणेश गोडसे, बार्शी

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये योग दिन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन, आय.क्यू.ए.सी., एन.एस.एस. द्वारा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात पार पडला. महाविद्यालयातील बी.एड., बी.पी.एड., एम. एड. व एम.पी.एड. विभागाचे प्रशिक्षणार्थी तसेच सर्व विभागाचे प्राध्यापक व महाविद्यालयाचे कार्यालयीन कर्मचारी तसेच संस्थेच्या शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदविला.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे तसेच योग मार्गदर्शक म्हणून एम.पी.एड. विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ. एस. एम. लांडगे महाविद्यालयाचे आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. डिसले, बी.पी. एड. विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. ए. जी. कांबळे, बी.एड. विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ. आर. ए. फुरडे तसेच विशेष



**बार्शी : योग करताना शिक्षकांसह विद्यार्थी.**

उपस्थिती म्हणून शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. पी. गुंड हे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. पी. पी. नरळे यांनी केले. प्रा. डॉ. एस. एम. लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयुष मंत्रालयाने चौकटीत योगाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. समारोपात प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी नियमित योग सरावाचे महत्वाचे असल्याचे सांगितले. सध्या दैनंदिन जीवनातील ताणतणावापासून मुक्त होण्यासाठी नियमित योगा करण्याचे आवाहन केले. आभार सहा. प्रा. एस. ए. सावळे यांनी केले. संचालन सहा. प्रा. पी. पी. नरळे यांनी केले.

My Solapur Edition
Jun 27, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

News by
गणेश गोडसे, बार्शी

## तांबवे, दगडे यांना पीएच.डी. प्रदान

बार्शी : येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथील शारीरिक शिक्षणशास्त्र विषयाचे संशोधन केंद्रातील शिक्षणशास्त्र विषयातील पेट ७ चे विद्यार्थी आबासाहेब जगन्नाथ तांबवे व पेट ८ चे विद्यार्थी अर्जुन व्यंकट दगडे यांनी विद्यापीठास अंतिम पीएच.डी. संशोधन प्रबंध सादर केला. पीएच.डी. मौखिक परीक्षेनंतर तांबवे व दगडे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. तांबवे यांच्या संशोधनाचा विषय रायगड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास असा होता. दगडे यांच्या संशोधनाचा विषय सातारा जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान वाढविण्यासाठी कृती कार्यक्रम निर्मिती व त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास असा होता. या दोन्ही विद्यार्थ्यांना बळीराम बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चळे येथील प्राचार्य तथा आंतर विद्याशाखा अभ्यास सहयोगी अधिष्ठाता डॉ. एस. एल. तांबे यांचे संशोधन मार्गदर्शन मिळाले. यशाबद्दल अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, पी. टी. पाटील, ए. पी. देवडवार, जयकुमार शितोळे, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले, प्राचार्य डॉ. तांबे, डॉ. एम. व्ही. मते, सर्व संशोधक मार्गदर्शक आदींनी अभिनंदन केले.



आबासाहेब तांबवे    अर्जुन दगडे

My Solapur Edition
Jun 27, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुढारी



बार्शी : शैक्षणिक साधननिर्मिती एकदिवसीय कार्यशाळेत उपस्थित असलेले मान्यवर.

## बी.एड. प्रशिक्षणार्थीसाठी साधननिर्मिती कार्यशाळा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन, बी.एड. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थीसाठी शैक्षणिक साधन निर्मिती एकदिवसीय कार्यशाळा झाली.

बी.एड. द्वितीय वर्षातील प्रशिक्षणार्थ्यांकडून अध्यापनास उपयुक्त अशा शैक्षणिक साधनांची प्रत्यक्ष निर्मिती करून घेणे, तसेच अध्यापनात नाविन्यपूर्णता वाढविणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी प्रभावी साधनांची ओळख करणे व प्रत्यक्ष कृतीमधून ती विकसित करणे ही आजच्या कार्यशाळेची प्रमुख उद्दिष्टे होती. सकाळच्या सत्राची सुरुवात डॉ. आर. ए. फुरडे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी कार्यशाळेच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकत शैक्षणिक साधनांचे महत्त्व अधोरेखित केले.

उद्घाटक पांडुरंग जाधव यांनी अगस्त्य फाऊंडेशनच्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली व शैक्षणिक साधन निर्मितीत कृतीशीलतेचे महत्त्व सांगितले. रणजीत भालेराव यांनी साधन व्यक्तीचा परिचय करून दिला. अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रशिक्षणार्थ्यांनी अशा कार्यशाळांचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले.

दिवसभराच्या सत्रानंतर समारोप सत्रात डॉ. एम. एस. डिसले यांनी शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीमध्ये अशा कृतींचे महत्त्व अधोरेखित केले. शेवटी कार्यशाळेबद्दल प्रा. डॉ. पी. ए.पाटील तसेच विद्यार्थी दीपाली देशमुख व सुदर्शन तनपुरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन योगिता गोडगे व सानिका बाबर यांनी केले. सुचिता गायकवाड यांनी आभार मानले.

My Solapur Edition
Jul 26, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुढारी

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये विविध कार्यक्रम उत्साहात

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा वर्धापन दिन, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णा भाऊ साठे जयंती कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही.पी. शिखरे होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने करण्यात आली. बी एड विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्‌घाटनही पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख पाहुणे जगदाळे यांनी प्रेरक मार्गदर्शन केले. ते म्हणाले, संस्थेत गुणवत्तेलाच प्राधान्य दिले जाते. शिक्षण क्षेत्रात संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक विकास साधणे गरजेचे आहे. उत्कृष्ट शिक्षक होण्यासाठी आवश्यक ती कौशल्ये व तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. ज्ञानाबरोबच मार्गदर्शन व समुपदेशन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. प्रशिक्षणार्थींच्या विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक डॉ. रविराज फुरडे यांनी केले. सुचिता गायकवाड, संगीता क्षीरसागर, रणजित भालेराव, स्वामिनी डोळसे यांनी मनोगत व्यक्त केले.


Solapur Edition

Aug 03, 2025 Page No. 06

Powered by: erelego.com

पुढारी



बार्शी : मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना मान्यवर.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये क्रीडा दिन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून श्री शिवाजी महाविद्यालय बार्शीचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. निंबाळकर हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा व क्रीडा साहित्याच्या पूजनाने झाली. बी. पी. एड. प्रशिक्षणार्थी यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनाबाबतचे मनोगत व्यक्त केले. नोकरी व व्यवसाय मार्गदर्शन करत असताना डॉ. निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांसमोर राज्य व राष्ट्रीय स्तरावर उपलब्ध असणाऱ्या नोकरी व व्यावसायिक संधींबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपामध्ये डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी सर्व प्रशिक्षणार्थींना लहान मुलांना व तरुण पिढीला मैदानावर येण्याबाबत प्रेरणा देण्याचा संदेश दिला.

My Solapur Edition
Sep 01, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2025 to 2026



**बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये गुरुपौर्णिमा कार्यक्रम प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ.शिखरे, प्राचार्य डॉ. करंडे यांच्यासह इतर मान्यवर.**

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये गुरुपौर्णिमा

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये आयक्यूएसी, सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने गुरुपौर्णिमा साजरी झाली. अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुलाखे कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय करंडे होते. यावेळी सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. बी. एड. प्रशिक्षणार्थी सुदर्शन तनपुरे यांनी गुरुपौर्णिमा निमित्ताने मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. करंडे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, गुरुचे स्थान अढळ आहे.विज्ञान, शिक्षण व तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रातील गुरू-शिष्य परंपरेचा आढावा घेतला. भाषावार प्रांत रचनेमुळे समाजात संघर्ष निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. शिखरे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेतला. त्यांनी गुरुचे कार्य व बदलती भूमिका विशद केली. प्रास्ताविक डॉ. आर. ए. फुरडे यांनी केले.विद्या वाघमारे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सानिका बाबर व योगिता गोडगे यांनी सूत्रसंचालन केले. सुचिता गायकवाड यांनी आभार मानले.

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2025 to 2026

अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

News by
गणेश गोडसे,बार्शी

## प्रा. पंकज नरळे यांना पीएच.डी. प्रदान

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथील शारीरिक शिक्षणशास्त्र तथा बी. पी. एड. विभागाचे सहायक प्राध्यापक पंकज नरळे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची शारीरिक शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांच्या संशोधनाचा विषय वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणविषयक अभिवृत्तीचा चिकित्सक अभ्यास असा होता. त्यांनी बी पी एड विभाग प्रमुख प्रा. डॉ ए जी कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. संशोधन कार्य पूर्ण केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, नंदकुमार जगदाळे, पी. टी. पाटील, ए. पी. देवडवार, जयकुमार शितोळे, डॉ. व्ही. पी. शिखरे, डॉ. एम. एस. डिसले, पीएच.डी. संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. एम. व्ही. मते यांनी अभिनंदन केले.



पंकज नरळे

My Solapur Edition
Sep 01, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s**

# College of Education, Barshi

**Publicity 2025 to 2026**

# पुढारी



बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये विज्ञान जत्रेदरम्यान प्रशिक्षणार्थ्यांसह उपस्थित मान्यवर.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये विज्ञान जत्रा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात व अगस्त्य इंटरनॅशनल फाऊंडेशन बंगळूर यांच्या संयुक्त विद्यमाने संत तुकाराम सभागृहात विज्ञान जत्रेचे आयोजन झाले. यामध्ये बी.एड. प्रशिक्षणार्थी व शालेय विद्यार्थी असे एकूण ४० विद्यार्थ्यांना विविध उपकरणे, साधने, मॉडेल्स, प्रयोग याचे प्रशिक्षण देण्यात आले.

शालेय विद्यार्थ्यांच्या विज्ञान जत्रेत मानवी शरीर अवयव, डोळ्यांची रचना, पवनचक्की व सोलर ऊर्जा, सूक्ष्मदर्शिका, चंद्रग्रहण व सूर्यग्रहण आदीसंदर्भात समर्पक मॉडेल्सद्वारे माहिती देण्यात आली. प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या हस्ते व प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी उपमुख्याध्यापक रामचंद्र सपताळे, प्रकल्प समन्वयक पांडुरंग जाधव, सुमित मुरूमकर, समन्वयक डॉ. एम. एस. डिसले, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एस. एम. लांडगे, संग्राम देशमुख आदी उपस्थित होते. शितोळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. शिखरे यांनी शालेय विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी विज्ञान जत्रेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. या विज्ञान जत्रेत बार्शीतील विविध शाळांचा सहभाग होता.

My Solapur Edition
Sep 02, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2025 to 2026**

लोकमत

# बी.एड. महाविद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**बार्शी :** शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शीच्या कर्मवीर सभागृहात १९९८-९९ या सुवर्ण बॅचचा ''माजी विद्यार्थी स्नेहमेळावा'' अत्यंत उत्साहाच्या वातावरणात पार पडला.

''आमचा प्रवास आमचे अनुभव'' या शीर्षकाखाली आयोजित या मेळाव्यात, माजी विद्यार्थ्यांनी आपल्या स्मृतींचा मागोवा घेत, जीवनातील कर्तृत्वाचे अनुभव कथन केले.

या गौरवशाली सोहळ्याचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू शिखरे यांनी भूषवले. व्यासपीठावर प्रा. एम.डी. मोहिते, प्रा. एम.ए. गायकवाड, प्रा.डॉ. व्ही.यू. पवार, प्रा.डॉ. एस.डी. भिलेगावकर, डॉ. ए.जी. कांबळे, डॉ. एमएस डिसले, डॉ. पीए पाटील, डॉ. पंकज नरळे या प्राध्यापकांची उपस्थिती होती. किरण चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. एम.डी. मोहिते, प्रा. एम.ए. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा गौरव केला. माजी प्राचार्या डॉ. व्ही.यू. पवार, प्रा.डॉ. एस.डी. भिलेगावकर, डॉ. ए.जी. कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

या सोहळ्यास डॉ. एम. एस. डिसले, डॉ. ए. जी. कांबळे, डॉ. परमेश्वर पाटील, डॉ. पंकज नरळे उपस्थित होते. हा मेळावा यशस्वितेसाठी लखन डिकुळे, संदेश घाडगे, किरण चव्हाण, राजकुमार कुलकर्णी, मंगेश कांबळे, वैशाली तांबिले, आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. मंगेश कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. वैशाली तांबिले यांनी मानले.

Solapur Main
Page No. 3 Oct 30, 2025
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2025 to 2026

पुढारी



बार्शी : स्नेहमेळाव्यासाठी जमलेले कॉलेज ऑफ एज्युकेशनचे माजी विद्यार्थी.

# माजी विद्यार्थ्यांनी केले आयुष्य प्रवासाचे कथन

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये रंगला स्नेहमेळावा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे बी.एड. बॅच सन २०११-२०१२ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. महाविद्यालयाच्या कर्मवीर सभागृह येथे या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे खजिनदार जयकुमार शितोळे उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे हे होते. यावेळी व्यासपीठावर माजी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी असोसिएशनचे समन्वयक डॉ. ए. जी. कांबळे, डॉ. ए. टी. पाटील, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. एम. व्ही. मते आदी उपस्थित होते.

मेळाव्याचा मुख्य विषय 'आमचा प्रवास, आमचा अनुभव' हा होता, ज्या अंतर्गत माजी विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासातील अनुभव कथन केले. प्रमुख पाहुणे जयकुमार शितोळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून माजी विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक केले.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी स्नेहमेळाव्याचे आयोजन केल्याबद्दल सर्वांचे कौतुक केले. ते म्हणाले, महाविद्यालयाच्या जडणघडणीत माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यातूनच अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येतात. गणेश ठवरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविक डॉ. ए. जी. कांबळे यांनी केले, तर डॉ. एम. व्ही. मते यांनी आभार मानले.

My Solapur Edition
Oct 31, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुढारी

संक्षिप्त

News by
गणेश गोडसे, बार्शी



पुणे : येथे बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याची सुरुवात करताना उपस्थित मान्यवर.

## बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**बार्शी :** येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बीपीएड विद्यार्थ्यांचा ३१ वर्षांनंतरचा स्नेहमेळावा शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी पुणे येथे झाला. हा भावनिक आणि आनंददायी कार्यक्रम गुरुजन लेखावळे, मनोहरन, चंद्रकांत पवार तसेच श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे यांच्या गौरवस्थानाने साकारला. नंतरच्या सत्रात सर्व विद्यार्थ्यांनी आपला परिचय करून दिला. कार्यक्रमाला रंगत घालत अधूनमधून गाणी सादर करण्यात आली. एक विशेष आकर्षण होते ते माजी विद्यार्थ्यांचा गाण्यावरील नृत्याचा कार्यक्रम, ज्याने सर्वांना इतक्या दिवसांनंतरही एकत्र आल्याचा आनंद द्विगुणित केला. यावेळी लेखावळे, मनोहरन आणि पवार यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नंदन जगदाळे यांनी गेट-टुगेदरचे महत्त्व समजावून सांगताना त्यांच्या जीवनातील काही स्मरणीय प्रसंग सांगितले. स्नेहमेळाव्याचे आयोजन माजी विद्यार्थी सध्या बालेवाडी क्रीडा संकुलाचे सहसचिव माणिक वाघमारे-पाटील यांनी केले. सूत्रसंचालन पूजा कुमठेकर व अमिता जाधव यांनी केले.

Solapur Edition
Nov 19, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2025 to 2026**

# पुढारी

News by
गणेश गोडसे, बार्शी




बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनतर्फे आयोजित कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना जयकुमार शितोळे. यावेळी उपस्थित मान्यवर.

## जगदाळेमामा जयंतीनिमित्त बार्शीत कर्मवीर कुस्ती स्पर्धा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त कॉलेज ऑफ एज्युकेशनच्यावतीने विविध गटातील कुस्ती स्पर्धा झाल्या.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख स्पर्धा सचिव डॉ. सुभाष मारकड यांनी करून दिली. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. विष्णू शिखरे यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रा. स्वप्निल अंधारे यांनी आभार मानले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी एम.पी.एड. विभागप्रमुख डॉ. सुरेश लांडगे, बी.पी.एड. विभागप्रमुख डॉ. अनिल कांबळे, स्पर्धा सचिव डॉ. सुभाष मारकड, आप्पा गायकवाड यांनी योगदान दिले.

My Solapur Edition
Nov 27, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2025 to 2026**

# पुढारी



बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये संविधानाबाबत मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. शिखरे.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये संविधान वाचनाचा कार्यक्रम

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे आयक्यूएसी व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या वाचनाचा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे हे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर आयक्यूएसी समन्वयक डॉ. एम. एस. डिसले, बी.एड तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आर. ए. फुरडे, बी. पी. एड्. विभाग प्रमुख डॉ. ए. जी. कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्व शिक्षक व प्रशिक्षणार्थींनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. शिखरे म्हणाले, भारतीय संविधानाची उद्देशिका ही विविध मूल्यांवर आधारित आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांची रुजवणूक झाली पाहिजे. प्रत्येकांनी ही मूल्ये जीवनात अंगीकारली पाहिजेत, असे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. आर. ए. फुरडे यांनी केले. भारतीय संविधान उद्देशिका वाचन सलमा मुलाणी यांनी केले. सूत्रसंचालन रेश्मा जगदाळे, तर रणजित भालेराव यांनी आभार मानले.

My Solapur Edition
Nov 28, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुढारी

# बार्शीत कर्मवीर जयंतीनिमित्त जलतरण स्पर्धा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त कॉलेज ऑफ एज्युकेशनच्यावतीने जलतरण स्पर्धा झाल्या.

स्पर्धेचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे पी. टी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. विष्णू शिखरे होते. याप्रसंगी पाटील म्हणाले की, जलतरण हा सर्वांगिण शारीरिक व्यायाम आहे. सर्व व्यायामांमध्ये पोहणे हा उच्च दर्जाचा व सर्वार्थाने सुंदर व्यायाम असल्याचे त्यांनी पटवून दिले.



**बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या वतीने आयोजित जलतरण स्पर्धेतील विजेते. समवेत उपस्थित मान्यवर.**

पोहण्यामुळे शरीराचा सर्वांगिण विकास होतो, तसेच मानसिक तणावरहित आरोग्याची जपणूक होते, हे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासाला नेहमीच समान महत्त्व दिले होते, याचीही त्यांनी उपस्थितांना विशेष आठवण करून दिली. त्यांच्या मार्गदर्शनातून सर्व विद्यार्थी-शिक्षकांना खेळांविषयी प्रेरणा मिळाली.

जलतरण स्पर्धेत माध्यमिक, उच्च माध्यमिक गट व महाविद्यालयीन गट यामध्ये मुले व मुली अशाप्रकारे स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी फ्रीस्टाईल, बॅकस्ट्रोक, ब्रेस्ट स्ट्रोक व बटरफ्लाय असे जलतरणाचे प्रकार घेण्यात आले. यासाठी ५० मीटर, १०० मीटर, २०० मीटर व ८०० मीटर या अंतराच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. अनिल कांबळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. पंकज नरळे यांनी केले.

My Solapur Edition

Nov 29, 2025 Page No. 03

Powered by: erelego.com

## Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal’s

# College of Education, Barshi

## Publicity 2025 to 2026

# पुढारी

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यापीठ परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यासचे सहयोगी अधिष्ठाता प्राचार्य डॉ. शशिकांत तांबे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील हे होते. व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे, माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे, डॉ. सुरेश लांडगे, डॉ. अनिल कांबळे, डॉ. रविराज फुरडे, डॉ. लाजवंती राठोड, डॉ. एम. एस. डिसले, माजी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे आदी उपस्थित होते.

एकूण ९५ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयात व विद्यापीठात प्रथम क्रमांक तसेच सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांचा विशेष पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. पाहुण्यांचा परिचय डॉ. एम. व्ही. मते यांनी करून दिला. डॉ. एम. एस. डिसले यांनी आभार मानले. डॉ. पी. ए. पाटील व डॉ. पी. पी. नरळे यांनी सूत्रसंचालन केले.



**बार्शी : पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. शशिकांत तांबे.**

My Solapur Edition
Jan 09, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक



बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये केटीएस परीक्षा देत असलेले विद्यार्थी.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये केटीएस परीक्षा

**बार्शी :** येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त सामान्य ज्ञानावर आधारित कर्मवीर टॅलेंट सर्च परीक्षेचे कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये आयोजन झाले. यात ७१ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला. महाविद्यालयीन स्तरावर एकूण १०० प्रश्न असलेली २०० गुणांची परीक्षा घेतली जाते. यात विविध घटकांवर आधारित बहुपर्यायी प्रश्न विचारले जातात. यावर्षीही या स्पर्धेत बी.एड., बी.पी. एड., एम.एड. एमपी. एड. विभागाच्या प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला. काजल पवार, संकेत ढेरे व महेश काळे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एम. एस. डिसले, स्पर्धा समन्वयक डॉ. एम. व्ही. मते, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

My Solapur Edition
Jan 09, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's**

# College of Education, Barshi

**Publicity 2025 to 2026**

# पुढारी

News by
गणेश गोडसे, बार्शी

**संक्षिप्त**



बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजित दौड.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ जयंती

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे हे होते. व्याख्याते म्हणून डॉ. रविराज फुरडे उपस्थित होते. राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून 'रन फॉर स्वदेशी' ही दौड झाली. यामध्ये प्रशिक्षणार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदवला. डॉ. रविराज फुरडे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना आत्मविश्वास व आत्मबळावर भर द्या, चारित्र्यनिर्मिती हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. शिखरे यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्याविषयीचे विचार व्यक्त केले. ते म्हणाले, स्वामी विवेकानंद यांचे विचार आजही युवकांना प्रेरणादायी आहेत. तसेच राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणेतूनच स्वराज्य निर्मितीचे स्वप्न साकार झाले. सूत्रसंचालन डॉ. पी. पी. नरळे यांनी केले.

Solapur Edition
Jan 15, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

# पुढारी

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये महिला खो-खो स्पर्धेचे आयोजन

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त दि. २० ते २२ जानेवारी या कालावधीत राज्यस्तरीय निमंत्रित महिला खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी दिली.

या स्पर्धा आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा.डॉ. चंद्रजित



जाधव यांनी मान्यता दिली आहे. या स्पर्धेत धाराशिव, सांगली, पुणे, ठाणे, सोलापूर व रत्नागिरी या जिल्ह्यातील एकूण आठ संघ सहभागी होणार आहेत.

नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांच्या हस्ते स्पर्धेचा शुभारंभ होणार आहे तर भूमी अभिलेख उपअधीक्षक रेशमा तांबारे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील हे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष राहणार आहेत. या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकास २१००० रुपये, द्वितीय क्रमांकास १५००० रुपये व तृतीय क्रमांकास ११००० रोख, प्रमाणपत्र व ट्रॉफी दिली जाणार आहे.

My Solapur Edition
Jan 20, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Publicity 2025 to 2026**

पुढारी

## राज्य महिला खो-खो स्पर्धेत निमंत्रित आठ संघ

### धाराशिव, सांगली, पुणे, ठाणे, सोलापूर व रत्नागिरी संघ सहभागी

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय निमंत्रित महिला खो-खो स्पर्धेचा शुभारंभ नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांच्या हस्ते पार पडला. धाराशिव, सांगली, पुणे, ठाणे, सोलापूर व रत्नागिरी अशा सहा जिल्ह्यातील एकूण आठ संघ सहभागी झाले आहेत.

प्रमुख पाहुणे म्हणून भूमी अभिलेखच्या उपअधीक्षक रेश्मा तांबारे या उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी सचिव पी. टी. पाटील होते. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून सरचिटणीस, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे प्रा.डॉ. चंद्रजित जाधव, नंदन जगदाळे, ए. पी. देवडवार, कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्रभारी प्राचार्य डॉ. विष्णू शिखरे आदी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर माजी प्राचार्य डॉ. सी. एस. मोरे, डॉ. दिलीप मोहिते, डॉ. एस. एम. लांडगे, स्पर्धा सचिव प्रा.डॉ. स्मिता सुरवसे, डॉ. सुभाष मारकड आदी उपस्थित होते.



**बार्शी : राज्य महिला खो-खो स्पर्धेच्या शुभारंभाप्रसंगी नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, रेश्मा तांबारे, पी. टी. पाटील आदींसह इतर मान्यवर.**

प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही.पी शिखरे यांनी केले. प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी विश्वकप संघाचे नेतृत्व करणाऱ्या खेळाडू तसेच राष्ट्रीय महिला खेळाडूंचे मनापासून कौतुक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पी. टी. पाटील यांनी संस्थेद्वारे राज्यस्तरीय विविध मैदानी सामन्यांचे आयोजन केल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. परमेश्वर पाटील व प्रा.डॉ. लाजवंती राठोड यांनी केले.

डॉ. रविराज फुरडे यांनी आभार मानले. स्पर्धेसाठी प्रा.डॉ. लांडगे, प्रा.डॉ. कांबळे, प्रा.डॉ.डिसले, स्मिता सुरवसे, एस. एस. मारकड, प्रा.डॉ. नरळे, प्रा. सावळे, प्रा. चव्हाण, प्रा. अंधारे, प्रा.डॉ. गोरे, डॉ. मते, डॉ. जाधव आदी परिश्रम घेत आहेत.

## हुतात्मा व उद्यान एक्स्प्रेसला थांबा देण्याची मागणी

**करमाळा :** जेऊर रेल्वेस्थानकावर सोलापूर-पुणे हुतात्मा इंटरसिटी व मुंबई-बंगलोर उद्यान एक्स्प्रेस या गाड्यांना प्रवासी थांबा मंजूर करणेबाबत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे क्षेत्रीय रेल्वे उपयोगकर्ता समितीचे सदस्य अजय दुबे यांनी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, जेऊर स्थानक हे करमाळा, जामखेड, इंदापूर, परंडा, भूम व कर्जत या तालुक्यांना संलग्न व दाट संपर्क असणारे मध्य रेल्वेवरील स्थानक असून जवळजवळ दोनशे ते तीनशे गावे जोडली गेलेली आहेत. या गावातील हजारो प्रवाशी रेल्वेने सतत येत-जात असतात. दवाखाना, कोर्ट कचेरीची कामे, शाळा, कॉलेज, खरेदी-विक्रीसाठी चाकरमानी यांना यावे-जावे लागते. सोलापूर, कुर्डूवाडी, दौंड, पुणे, मुंबई, बंगळुरू याठिकाणी येण्या-जाण्यासाठी हुतात्मा इंटरसिटी व उद्यान एक्स्प्रेस या गाड्यांचा जेऊर स्थानकावर थांबा मिळणे आवश्यक आहे. थांबा मिळाल्यास प्रवाशांची खूप सोय होईल.

My Solapur Edition
Jan 22, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

# Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's
# College of Education, Barshi
## Publicity 2025 to 2026

अमृतमहोत्सवी

**पुढारी**

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

News by
गणेश गोडसे, बार्शी



**बार्शी : येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन व मसाप बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन साजरा झाला.**

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये गौरव दिन

**बार्शी :** येथील कॉलेज ऑफ एज्युकेशन व मसाप बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन साजरा झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र दास उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ व्ही. पी. शिखरे होते. व्यासपीठावर मसाप बार्शी शाखाचे अध्यक्ष पां. न. निपाणीकर, प्राचार्य डॉ. दीपक गुंड, बी. आर. देशमुख, प्रकाश गव्हाणे, प्रकाश महामुनी, दिलीप कल्याणी, शारदा पानगावकर, सुमन चंद्रशेखर, आर ए फुरडे, ए जी कांबळे, एम. एस. डिसले आदी उपस्थित होते. डॉ. दास म्हणाले, भाषेची जवळीकता वाढवा. वाचन पाहिजे. मराठी भाषेचे संरक्षक व वाहक व्हा. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ व्ही पी शिखरे म्हणाले, मातृभाषा हेच खरे शिक्षणाचे माध्यम आहे. मराठी भाषेचा सन्मान जोपासला पाहिजे. फुरडे यांनी प्रास्ताविक केले. आभार कल्याण घळके यांनी मानले. पी. ए. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. अफरोजजहान मोमीन व अनुपमा भालेराव यांनी सूत्रसंचालन केले.

Solapur Edition
Mar 01, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

## Publicity 2025 to 2026

पुढारी



बार्शी : एकांकिका सादर करताना कॉलेज ऑफ एज्युकेशनचे विद्यार्थी.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये विज्ञान दिन

**बार्शी :** कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे होते. व्यासपीठावर डॉ. ए. जी. कांबळे, डॉ. आर. ए. फुरडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. पी. ए. पाटील, डॉ. एम. व्ही. मते, डॉ. पी. पी. नरळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला योगिता गोडगे व सानिका बाबर यांनी विज्ञान गीत सादर केले. बी. एड. प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यत आले. सायली करडे यांनी विद्यार्थी मनोगत व्यक्त केले. बी. एड. प्रशिक्षणार्थींनी 'आम्ही उद्याचे विज्ञान शिक्षक' यावर आधारित एकांकिका सादर केली. यात निकिता चव्हाण, ऋतुजा ढेरे, ज्ञानेश्वर गायकवाड, शीतल यादव, सौरभ गवळी, जयंत शेंडगे व प्रणवसिंह ढोकळे यांनी सादरीकरण केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन याविषयी सविस्तर माहिती विशद केली. डॉ. पी. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. अफरोज मोमीन व संगीता क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. अजय कुंभार यांनी आभार मानले.

My Solapur Edition
Mar 04, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

Publicity 2025 to 2026

पुढारी

संक्षिप्त



बार्शी : डॉ. तेजस्वी गपाट यांची मुलाखत घेताना बी.एड. प्रशिक्षणार्थी सुचिता गायकवाड.

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये महिला दिन

**बार्शी :** येथील शिक्षण शास्त्र महाविद्यालयात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'यशस्वी महिला मुलाखत' कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे म्हणून सनदी लेखापाल तेजस्वी गपाट या उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे होते. यावेळी व्यासपीठावर आर. ए. फुरडे, ए. जी. कांबळे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. व्ही. मते, डॉ. पी. ए. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महिला सक्षमीकरण या विषयावर आधारित पोस्टर स्पर्धेतील आरती गायकवाड, रणजित भालेराव, संकेत ढेरे, वैभवी जगताप व अफरोजहा मोमीन यांना बक्षीस म्हणून ग्रंथ व लेखणी भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यशस्वी महिला म्हणून डॉ. तेजस्वी गपाट यांची बी. एड. प्रशिक्षणार्थी सुचिता गायकवाड यांनी मुलाखत घेतली. मुलाखतीतून डॉ. गपाट यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. शीतल यादव यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय संगीता क्षीरसागर यांनी करून दिला. सीमा चिखले व योगिता गोडगे यांनी सूत्रसंचालन केले. अफरोजहा मोमीन यांनी आभार मानले.

## Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

### Publicity 2025 to 2026

# पुढारी

News by
गणेश गोडसे, बार्शी

## कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये बी. एड. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थींचा सदिच्छा समारंभ व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे उपस्थित होते. व्यासपीठावर आर. ए. फुरडे, एम. एस. डिसले, पी. ए. पाटील, एम. व्ही. मते, एम. एन. खरटमल आदी उपस्थित होते.

सुहास भुसारे, सीमा चिखले, योगिता गोडगे, सुचिता गायकवाड व सुदर्शन तनपुरे या बी एड प्रशिक्षणार्थींनी दोन वर्षे प्रशिक्षण कालावधीत आलेले अनुभव विशद केले. यावेळी सेट, नेट, टीईटी, सीटीईटी, टेट या विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्या प्रशिक्षणार्थींचा कॉलेजच्या वतीने गौरवपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विविध



**बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील बी. एड. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थींसह शिक्षक.**

उपक्रमात नाविन्यपूर्ण कामगिरी केलेल्या प्रशिक्षणार्थींचा देखील प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यात उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी म्हणून रणजीत भालेराव व योगिता गोडगे यांना सन्मानित करण्यात आले.

शितोळे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना म्हणाले की, कर्मवीर मामांच्या स्वप्नातील शिक्षक घडविण्याचे काम हे महाविद्यालय करत आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. या महाविद्यालयाच्या विविध उपक्रमातून सक्षम शिक्षक निर्माण केले जात आहेत असे सांगितले.

अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी प्रशिक्षणार्थींच्या व्यक्तिमत्व विकासासाठी महाविद्यालयाने राबविलेले उपक्रम विशद केले. प्रास्ताविक डॉ. एम. एस. डिसले यांनी केले. प्राध्यापक मनोगत म्हणून डॉ. एम. व्ही. मते यांनी विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन वैष्णवी घाडगे व सानिका जाधव यांनी केले. डॉ. पी. ए. पाटील यांनी आभार मानले.

My Solapur Edition
Apr 07, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com
Powered by: erelego.com